# अवघी विठाई माझी

मश्रुम बद्दल आजही अनेकांच्या मनात अढी असते. खुप जण ते खात नाहीत. त्यापैकी काही कारणे अशी. अनेकांना ते मांसाहारी वाटते. हे खरे आहे कि मश्रुम हा बुरशीचा एक प्रकार आहे, आणि त्याजी गणना भाज्यातच काय, वनस्पतींमधे देखील होणार नाही. त्यांच्यामधे हरितद्रव्य नसते. ते प्रकाशसंश्लेषण करत नाहीत. पण ते प्राणीही नव्हेत. मश्रुम हा एक वेगळाच वर्ग आहे. दुसरे कारण असे कि, त्यांच्या निर्मितीबद्दल अनेक प्रवाद आहे. मराठीत त्याला जो प्रतिशब्द पुर्वी वापरात होता,तोही या गैरसमजास कारणीभूत आहे. मश्रुंमांचे अचानक उगवणे हे त्याच्या उत्पत्तीबाबत संदेह निर्माण करते. पण आपल्याला जरी त्याचे दष्यरुप अचानक दिसत असले, तरी त्याची प्रक्रिया, छुप्या रितीने सुरुच असते. त्याच्या भक्ष्यावर किंवा आतमधे, सुक्ष्म तंतूंचे जाळे पसरलेले असते. आणि ते ज्यावेळि फ़ूलावर येते, त्याचवेळी जमिनीवर ते दिसू लागते. मी फ़ूलावर असा शब्द वापरला, कारण तो त्या रुपाच्या जास्त जवळ जाणारा आहे. वनस्पतींमधे बीजनिर्मितीचा एक भाग म्हणून फ़ुले निर्माण केली जातात, आणि मश्रुम हे पण तत्सम रुप आहे. पण फ़ूलांप्रमाणे, परागकण, परागीभवन फ़लन असे टप्पे इथे नसतात. थेट बियांचीच निर्मिती केली जाते. इतर वनस्पतींच्या फ़ूलांप्रमाणे, किटकांना आकर्षित करण्यासाठी, रंग, सुवास, मध (खरे तर तो मध नसतो, केवळ साखरपाणी असते. मध हि पुर्णतः मधमाशांची निर्मिती आहे.) इथे नसतोच. तशी गरजच नसते. मश्रुमची बीजनिर्मिती, स्वावलंबनाने होते.त्यात इतर बाह्य घटकांचा सहभाग नसतो. तरीपण काही मश्रुम अत्यंत आकर्षक रंगरुप घेऊन येतात. पण ते कुणासाठी असते याची कल्पना नाही. निसर्गात क्वचितच कुठला पशुपक्षी मश्रुम नियमीत खात असेल. पण मानवाला मात्र ते खाद्य म्हणून पुर्वापार माहीत आहे. मी आधी लिहिल्याप्रमाणे, सोमवल्ली हि पण एक मश्रुमचीच जात होती. गुलाबी रंगावर पांढरे ठिपके असे तिचे रुप असे, आणि ती चंद्रप्रकाशात चमकत असे, म्हणुन हे नाव. तिच्यापासूनच सोमरस तयार करत असत. उन्मादावस्था आणणारे पेय, म्हणून ते लोकप्रिय होते. व्यावसायिक स्वरुपात मश्रुमची लागवड ही अगदी अलिकडेच करण्यात येत असली, तरी आपल्याकडे काही मश्रुम पुर्वापार खातात.गोव्याला, मातकट रंगाचे खास मश्रुम याच दिवसात, म्हणजे पहिल्या पावसानंतर आठ दहा दिवसातच मिळतात. अर्धी ओंजळ भरुन मश्रुम, हे तीन वर्षांपुर्वी १५० ते २०० रुपयांना मिळत असत. हे मश्रुम, वारुळांवरच उगवतात. पुर्वी ते खुडण्याची खास पद्धत होती. हे मश्रुम पहिल्यांदा ज्याला दिसतील तो त्यावर एखादी फ़ांदी झाकून ठेवत असे. मग काहि दिवसांनी त्याची वाढ पूर्ण झाली,कि तोच येऊन ते खुडत असे. इतर कुणीही त्याच्या वाटेला जात नसत. असे केल्याने, बीजनिर्मीतीस पुरेसा अवधी मिळत असे. पण आता मात्र, तितकी सभ्यता आणि संयम न राहिल्याने, अगदी बाल्यावस्थेतच, म्हणजे अगदी काडेपेटीतल्या काड्यांइतके असतानाच ते खुडले जातात. (उत्तम किंमतीचे आकर्षण असतेच) आणि असे केल्याने, ते मिळण्याचे प्रमाण देखील कमी आहे. याची भाजी, गोव्यात मटणाचा मसाला लावुन करतात.

# कर्जमाफीच्या आशेने वसुली रखडली

रिसोड : पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या प्रचार सभेत शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचेआश्वासन दिलेत्यामुळे शेतकऱ्यांच्या नजरा आता कर्जमाफीकडे लागल्याआहेत. अशातच येत्या १० मार्चला राज्याचा अर्थसंकल्प सादर होणार असल्याने या अर्थसंकल्पात कर्जमाफीची घोषणा केल्या जाईल अशी अपेक्षा शेतकऱ्यांना आहे. शासनाने कर्जमाफीच्या दाखवलेल्या गाजरामुळे शेतकऱ्यांची कर्ज परतफेडीची मानसिकता कमी झाली. बिनव्याजी पीक कर्ज भरण्याची अंतिम मुदत ही ३१ मार्च असल्याने कर्जमाफीच्या आशेपोटी अनेक शेतकऱ्यांनी पीक कर्ज भरण्याचा कानाडोळा केला. त्यामुळे सेवा सहकारी सोसायट्यांची कर्ज वसुली झाली नाही. तेथे अर्थसंकल्पात जर कर्जमाफीची घोषणा झाली नाही तर ३१ मार्चपर्यंत शेतकऱ्यांना काहीही करून बिनव्याजी पीक कर्ज भरावे लागणार आहे. सन २००८ मध्ये मोठी कर्जमाफी तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी केली होती. त्यानंतर राज्यात २०१४ ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी कर्जमाफी योजना आणली. यावेळी थकबाकी दारांबरोबर पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही प्रोत्साहन अनुदान दिले. २०१९ च्या निवडणुकीनंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना आणली. या योजनेचे अजून गुऱ्हाळ सुरू आहे.(ता.प्र.)

# यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी

रिसोड : स्थानिक स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.एन.गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली या जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ.एम.एन.गायकवाड यांनी प्रास्ताविक भाषणातून आपले मत व्यक्त करताना असे म्हटले की, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. त्यांनी काही काळ भारताचे उपपंतप्रधान म्हणून काम केले होते. तर काही काळ ते भारताचे संरक्षणमंत्री सुद्धा होते. ते प्रागतिक विचारसरणीचे होते.उत्कृष्ट संसदपटू,उदारमतवादी व अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ख्याती आहे. ते रसिक व साहित्यिकही होते. 'युगांतर', 'सह्याद्रीचे वारे', 'कृष्णाकाठ', 'ऋणानुबंध' ही त्यांची साहित्यसंपदा आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. डॉ. प्रकाश हनवते यांनी केले. आभारप्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम प्रा. डॉ. केशव कोकाटे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी, प्रा.डॉ. सिद्धार्थ इंगोले यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक,प्राध्यापिका व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.( वि. प्र)



# जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



रिसोड : सुभेदार- रामजी आंबेडकर ट्रस्टच्या वतीने एकता नगर मधील संबोधी बुद्ध विहाराच्या प्रांगणामध्ये जागतिक महिला दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी- इंदुताई तुरुकमाने होत्या तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रसिद्ध विधिज्ञ- ॲड. नुतनताई भराड होत्या. ॲड. भराड यांनी महिलांच्या संरक्षणासाठी असणाऱ्या कायद्यांची विस्तृत माहिती दिली.

तसेच प्रा.डॉ. आम्रपाली भगत यांनी स्त्रियांनी उच्चशिक्षित बनले पाहिजे , उच्चशिक्षित झाल्यावर परिवाराचा व पर्यायाने समाजाचा विकास होईल असे सांगितले, तर सामाजिक कार्यकर्त्या- सौ. प्रमिलाताई शेवाळे यांनी आपल्या भाषणातून महिलांनी संघटीत होऊन समाजाला एकत्र जोडण्याचे काम केले पाहिजे,असे सांगितले तर सौ. आम्रपाली पठाडे यांनी आपल्या भाषणातून अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा- सौ. इंदुताई तुरुकमने यांनी आपल्या अध्यक्षीय- भाषणातून स्त्रियांना विस्तृत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला- संध्याकाळी पंडित, महानंदाताई वाठोरे, सुनिताताई अंभोरे, मंदाताई धाडे ,मीनाताई चव्हाण,गुंफाताई इंगोले,सुजाता खरात ,लताताई धाडे , उषाताई खंडारे, सुनंदाताई मोरे, द्वारकाबाई धाडे, वंदना मोरे ,अर्चना वाघमारे, जिजाबाई कळासरे, सुभेदार- रामजी आंबेडकर ट्रस्ट ,भारतीय बौद्ध महासभा ,माता- रमाई महिला मंडळ ,सिद्धार्थ नवयुवक,युवती मंडळाच्या सर्व पदाधिकारी महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन- दीक्षा कळंबे यांनी केले तर आभार- अश्विनी खैरे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला बहुसंख्य महिला व पुरुष मंडळी उपस्थित होते.(श. प्र.)

## शेतकऱ्यांवरील संकट गडद, आत्महत्यांचे प्रमाण वाढले

# संकटग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी भूमिपूत्रचे १९ मार्चला अन्नत्याग आंदोलन

केवळ शेतीवर अवलंबून असणाऱ्यांच्या संख्येत कमालीची घट होऊन ती 10 ते 15 टक्क्यांवर आली आहे. तरीही तेव्हढ्याच शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत, जेव्हढ्या 50 ते 60 टक्के शेतकरी शेतीवर अवलंबून होते. आजमितीस तर दिवसाला सात ते आठ शेतकरी आत्महत्या होत असल्याचे धक्कादायक चित्र समोर येत आहे. याचा अर्थ असा की, केवळ शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबावरील संकट अधिक वाढले आहे. यामध्ये प्रामुख्याने सततची नापिकी, आस्मानी संकटासोबतच मानव निर्मित सुल्तानी संकटात झालेली वाढ ही प्रमुख कारणे आहेत. परिणामी उपवर झालेल्या शेतकरी मुलांच्या लग्नाची चिंता, शेतमजुरीत झालेली वाढ, प्रचंड महागाईमुळे वाढलेला उत्पादन खर्च, कुटुंबातील सदस्यांच्या आरोग्याचा प्रश्न आणि सोबतच शासकीय यंत्रणेत बोकाळलेला भ्रष्टाचार आदी कारणांमुळे शेतकरी कमालीचे त्रस्त आहेत. म्हणून दरवर्षी प्रमाणे याही वर्षी 19 मार्च रोजी भूमिपुत्रांकडून अन्नत्याग आंदोलन करण्यात येणार असून, संकटग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा व जिवंत शेतकऱ्यांना जागरुक करण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे. संपूर्णतः निसर्गावर अवलंबून असलेला शेती व्यवसाय हा बेभरवशाचा उद्योग झाला आहे. त्यातच शासन, प्रशासन आणि दलालांकडून सातत्याने शेतकऱ्यांची पिळवणूक केली जात आहे. परिणामी या व्यवसायातून अनेक शेतकरी बाहेर पडत असल्याची माहिती देत, सन 2019 पासुन मार्च 2025 पर्यंत एकट्या महाराष्ट्रातील शेती योग्य असलेले 3.25 लाख हेक्टर क्षेत्र अकृषक करून रस्ते, ईमारती, धरणे आणि झपाट्याने वाढणाऱ्या महनगरांसाठी वापरले गेले आहे. त्यामुळे जमिनधारक हजारो शेतकरी आपसूकच शेती क्षेत्रातून बाहेर पडले असल्याची माहिती भुतेकर यांनी दिली आहे.



**प्रतिकुटुंब 18 हजार द्या..! भूमिपुत्रची मागणी.**

ज्या कुटुंबात शेतीबाह्य उत्पन्न येऊ लागले, त्या कुटुंबातील आत्महत्या टळल्या आहेत असे दिसून येते. राहिलेल्या 20-25 टक्के शेतकऱ्यांच्या कुटुंबात शेतीबाह्य उत्पन्न कसे येईल याचा तातडीने विचार सरकारने केला पाहिजे. सरकारी वेतन आयोगाच्या शिफारशी नुसार चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यासाठी 18 हजार रुपये महिना ठरवले आहे, तसे 18 हजार रुपये महिन्याला या कुटुंबांना पोचविण्याची तरतूद सरकारने करावी. यासाठी इतर अनुदान बंद करावी , असे पत्र भूमिपुत्र कडुन सरकारला देण्यात आले आहे.

संपूर्ण महाराष्ट्र हादरवून टाकणाऱ्या साहेबराव करपे कुटुंबाच्या सामूहिक आत्महत्येला 19 मार्च रोजी 39 वर्षे होतात. या काळात लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. परंतु लोकसभा व विधान सभेत आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांना साधा श्रद्धांजली अर्पण करणारा ठराव देखील करण्यात आला नाही. यावरुन राज्यकर्ते शेतकऱ्यांच्या प्रती किती संवेदना शून्य झाले आहेत, याची प्रचिती येते.

19 मार्च हा शेतकारी सहवेदना दिवस आहे, या दिवशी लोकसभा- विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलवून. आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करुन शेतकरी आत्महत्या होणार नाहीत, यासाठी उपाययोजना करावी, असे आवाहन भूमिपत्र शेतकरी संघटनचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर व किसानपुत्रचे अमर हबीब यांनी केले आहे. त्यांनी महाराष्ट्र विधानसभेच्या सभापतींना तसे पत्रही पाठविले आहे.

सरकारचे शेतकऱ्यांप्रति

असंवेदनशील वागणे, शेतमालाचे पडलेले भाव, नैसर्गिक आपत्ती, शेती आणि शेतकऱ्यांचा वाढलेला खर्च यामुळे शेतकऱ्यांवरील संकट अधिक गडद झाले आहे. शेतीत प्रत्यक्ष काबाडकष्ट करुन जीवन जगणाऱ्या शेतकऱ्यांच्या समस्या शासनापर्यंत आणि समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी एक दिवसीय अन्नत्याग आंदोलन स्वर्गीय साहेबराव करपे व स्व. मालती करपे यांनीं सहकुटुंब पहिली शेतकरी आत्महत्या 19 मार्च 1984 ला यवतमाळ जिल्ह्यातील चिलगव्हाण यथे केली होती, म्हणुन हा दिवस शेतकरी सहवेदना दिवस म्हणुन पळाला जातो. याच दिवासी देश भर शेतकरी चालवळीकडून अन्न त्याग आंदोलन केले जाते.

शेतकरी तथा शेतकऱ्या प्रति तळमळ असणारांनी आपण ज्या ठिकाणी असाल त्याच ठिकाणी 19 मार्चला 10 ते 5 या वेळेत उपवास करुन सहवेदना अर्पण करायची असल्याचे विष्णुपंत भुतेकर यांनी सांगितले.

# जन्म-मृत्यू प्रमाणपत्रासाठी सबळ पुरावे आवश्यक

मुंबई : जन्म-मृत्यू झाल्यावर एक वर्षाहून अधिक काळानंतर प्रमाणपत्र मिळविताना सबळ पुरावे न दिल्यास किंवा खोटी माहिती दिल्यास अर्जदारावर फौजदारी कारवाई करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यासाठी पोलीस अभिप्रायही बंधनकारक केला आहे. बांगलादेशी किंवा रोहिंग्यांना मिळणारी बनावट जन्म प्रमाणपत्रे रोखण्यासाठी हा निर्णय घेतला आहे, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.जन्म-मृत्यूच्या नोंदीची प्रकरणे 'अर्ध-न्यायिक' असल्याने अतिशय सूक्ष्म पद्धतीने हाताळण्यात येतील. एखाद्याचा जन्म अथवा मृत्यू होऊन एक वर्षापेक्षा अधिक कालावधी झाला असेल व त्यांच्या संबंधितांना ही प्रमाणपत्रे पाहिजे असतील, मात्र त्याबाबतचे सबळ पुरावे नसतील, अशा अर्जदाराविरुद्ध थेट फौजदारी कारवाई करणार असल्याचे बावनकुळे यांनी नमूद केले.

पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक ) । R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)



# विकासासाठी पर्यावरणाचे संतुलन राखणे गरजेचे

## डॉ. वाय.एस. साखरे यांचे प्रतिपादन

रिसोड : स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारा आयोजित दत्तकग्राम मौजे मोरगव्हाण येथील विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिरात बौद्धिक सत्राचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे डॉ. रवी खाडे यांनी भुषविले तर वक्ते तथा प्रमुख उपस्थिती डॉ. योगेश साखरे डॉ.रवी खडसे (पुंडलिकराव गवळी महाविद्यालय, शिरपूर जैन) यांनी भूषविले.

याप्रसंगी मंचावर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. केशव कोकाटे यांची उपस्थिती होती. बौद्धिक सत्राच्या दुपारच्या सत्रामध्ये बोलताना डॉ. योगेश साखरे यांनी मानवी जीवनात पर्यावरणाला अनन्यसाधारण महत्त्व असून मनुष्याला स्वतःचा सर्वांगीण विकास करून घ्यायचा असेल तर पर्यावरणाचा समतोल राखणे गरजेचे असल्याचे सांगितले. व त्याचबरोबर पर्यावरणाच्या संवर्धनाच्या विविध उपाययोजनांची सखोल अशी माहिती विद्यार्थ्यांना देऊन पर्यावरणाविषयी सजग राहणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत प्रतिपादन केले.

प्रा. रवी खडसे यांनी अनमोल असणारे जीवन व्यर्थ विनाकारणी, बिनकामाच्या वाईट, घातकी, सवयीमध्ये, विचारांमध्ये, ताणतणावामध्ये न घालवता व्यक्तिमत्त्वाला विविध पैलू घडविण्यामध्ये घालवावे. संभाषण कौशल्य, आत्मविश्वास, नेतृत्व गुण, संवादक्षमता, स्वावलंबन, आत्मविश्वास, कलांची जाण व विकास या बाबींवर मुद्दामहून कटाक्षाने लक्ष द्यावे. तसेच ताणतणावावर नियंत्रण कसे करावे याविषयीच्या काही विशेष महत्त्वाच्या बाबीही विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्या. अध्यक्षीय भाषणातून डॉ. रवी खाडे यांनी वक्त्यांच्या विचारांचा परामर्श घेत राष्ट्रीय सेवा योजना हे स्वयंसेवकांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी अतिशय महत्त्वाच्या स्वरूपाचे अनमोल अशा प्रकारचे भक्कम व्यासपीठ असल्याचे मत प्रतिपादन केले. सूत्रसंचालन वैष्णवी पवार, प्रास्ताविक कु. पायल मोरे, आभार प्रदर्शन आदित्य खोडके यांनी केले. (वि. प्र)

### देशसेवसाठी उत्तम नागरिक शिबीरात घडतात- मंगलवाडीकर

सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये रात्री०८ ते १० या वेळामध्ये.ह.भ.प. धनंजय महाराज मंगलवाडीकर यांचे मनोरंजक व प्रबोधक शैलीतील सुश्राव्य असे हरिकीर्तन झाले. त्यातून राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचे एकूणच कार्य पुण्याचेच कार्य असल्याचे विचार त्यांनी व्यक्त करत देशसेवेसाठी उत्तम नागरिक शिबिरात घडत असल्याचे मत व्यक्त करत आनंद व्यक्त केला. कार्यक्रम प्रसंगी सहकार्यक्रमाधिकारी डॉ.अमोल अढाव, महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. ए. पी. भगत यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक-सेविका व गावकरी बंधू भगिनी भजनी मंडळ बहुसंख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय लवकर घ्या अन्यथा आंदोलन



## घनश्याम मापारी यांचा इशारा

**रिसोड** : शासनाने विशेष अधिवेशन घेऊन शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय घ्यावा, अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे रिसोड तालुका समन्वयक घनश्याम मापारी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

निवेदनात नमुद केले आहे नुकत्याच पार पडलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकऱ्यांची कर्जमाफी जाहीर केल्या जाईल, अशी भाबडी अशा शेतकऱ्यांमध्ये होती व तशी आश्वासने महायुतीकडून निवडणुकीपूर्वी दिली. या सर्व विषयाचा आता विसर पडत राज्य शासनाकडून शेतकऱ्यांची दिशाभूल करून एक प्रकारे तोंडाला पाने पुसण्याचे काम केले जात आहे.गडगडलेल्या शेतमालाच्या बाजारभावामुळे व वाढलेल्या उत्पादन खचामुळे शेतकऱ्यांचे संपूर्ण अर्थचक्र बिघडले आहे.शेती संपूर्णतः तोट्यात जाताना पाहायला मिळत आहे.एकीकडे शासन वेगवेगळ्या योजना आखून मोठ्या प्रमाणात आर्थिक उधळपट्टी करीत आहे. राज्यातील सत्ताधारी पक्षातील नेते मंडळी सुद्धा शेतकऱ्यांना कर्जमाफीची नितांत आवश्यकता असल्याचे जाहीरपणे विधिमंडळात भूमिका मांडत आहेत.तरी सुद्धा गेंड्याच्या कातडीचे शासन संवेदना बधीर करून शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला असून वसुलीला जाणाऱ्या बँक कर्मचाऱ्यांना चोपून काढण्यापर्यंत शेतकऱ्यांचा उद्रेक होऊ शकतो. त्यामुळे शासनाने अन्नदात्या शेतकऱ्यासाठी तत्काळ विशेष अधिवेशन बोलावून शेतकऱ्यांची संपूर्ण पीक कर्ज माफ करावे, अन्यथा रिसोड तालुक्यातील शेतकऱ्यासह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने पश्चिम विदर्भ प्रमुख खासदार अरविंद सावंत,खासदार संजय देशमुख, जिल्हा संपर्कप्रमुख दिलीप जाधव, सह संपर्कप्रमुख डॉ.सुधीर कव्हर, जिल्हा प्रमुख सुरेश मापारी, रिसोड विधानसभेचे सह संपर्कप्रमुख विश्वनाथ सानप, उपजिल्हाप्रमुख डॉ.चंद्रशेखर देशमुख यांच्या मार्गदर्शनात आंदोलन करण्यात येईल. असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे यांना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे रिसोड तालुका समन्वयक घनश्याम मापारी यांनी दिला आहे.

### मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेत ५ महिन्यांची वाढ

वाशिम, १३ मार्च (जिमाका) महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेत प्रशिक्षणार्थींच्या कार्यप्रशिक्षण कालावधीसाठी ५ महिने वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. या शासन निर्णयानुसार, सहा महिने पूर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थींनी दि. ३० एप्रिल २०२५ पर्यंत रुजू होणे आवश्यक आहे.

प्रशिक्षणार्थी व उद्योजकांसाठी महत्त्वाची सूचना: सर्व उद्योजक आणि प्रशिक्षणार्थींना ३० एप्रिल २०२५ नंतर पुन्हा रुजू करून घेण्यात येणार नाही. त्यामुळे, सर्वांनी आपल्या जुन्या प्रशिक्षणार्थींना लवकरात लवकर रुजू करून घ्यावे. अधिक माहितीसाठी संपर्क: यासंदर्भात अधिक माहिती आवश्यक असल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, वाशिम येथे संपर्क साधावा. असे प्रवीण खंडारे सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, वाशिम यांनी कळविले आहे.



रिसोड : येथील भारत प्राथमिक मराठी शाळेत जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून अंगणवाडी सेविका कर्मचाऱ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला.

# ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांचा सत्कार



रिसोड : रिसोड : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सुभेदार- रामजीआंबेडकर ट्रस्टच्या वतीने संबोधी बुद्ध विहारामध्ये नवनियुक्त ठाणेदार- रामेश्वर चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला.

सदर सत्कार कार्यक्रमामध्ये बोलताना ठाणेदार - चव्हाण म्हणाले की, महिला ह्या देशाचा खरा आधारस्तंभ आहेत, महिलांनी आत्मनिर्भर बनले पाहिजे आणि शिक्षण घेऊन उत्तरोत्तर प्रगती केली पाहिजे तसेच आई- जिजाऊ ,आई सावित्रीबाई ,आई - रमाई, आई- भीमाई, राणी- लक्ष्मीबाई, अहिल्याबाई यांचा आदर्श सर्वांनी डोळ्यासमोर ठेवला पाहिजे ,असे मोलाचे मार्गदर्शन त्यांनी केले . तसेच कार्यक्रमाला विदर्भवादी विचारवंत तथा धडाडीचे नेते- दत्तरावजी धांडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सदर कार्यक्रमाला- प्रमुख आयोजिका - प्रमिला शेवाळे, इंदुताई तुरुकमाने, महानंदा वाठोरे, संध्या पंडित ,मंदा धांडे, सुजाता खरात, लताताई धांडे, गुंफाबाई इंगोले , प्रा. कल्पना वानखडे, प्रा. लता हेलोडे ,मीना चव्हाण, वंदना मोरे , आम्रपाली पठाडे ,अंतकला जाधव ,दीक्षा कळंबे ,अश्विनी खैरे, मीना चव्हाण तथा सुभेदार- रामजी आंबेडकर ट्रस्टचे- प्रा. डॉ. विजयराव तुरुकमाने, प्रा. डॉ. दिगांबर अंभोरे, प्रा. जयंतराव हेलोडे, प्रा. दामोदर धांडे ,प्रा. अलंकार खैरे ,प्रा. श्रीराम कळासरे, मेजर- कैलास कळासरे, मेजर- कपिल वाठोरे, मेजर- रामभाऊ अंभोरे, भगवानराव जाधव, सुनील गवई दशरथ मोरे, दादाराव अंभोरे विश्वासराव जमधाडे आदी पदाधिकारी उपस्थित होते. एकता नगर मधील संपूर्ण महिला व पुरुष मंडळी उपस्थित होते. (वि. प्र.

# आनंद जलधारा पाणपोईचे उद्घाटन

## महिला मोठ्या संख्येने उपस्थित



रिसोड : येथील सामाजिक विचारवंत तथा ज्येष्ठ समाज सेवक - भास्करराव प्रधान यांच्या आनंद बागेतील "" संत कबीर कुटी "" वाशिम रोड येथे ""आनंद जलधारा पाणीपोई "" चे उद्घाटन - महिला मंडळाच्या शुभहस्ते करण्यात आले . सदर पाणपोई च्या उद्घाटन प्रसंगी बोलताना - भास्करराव प्रधान यांनी , रणरणत्या उन्हामध्ये सर्वच प्राणीमात्रांना पाण्याची नितांत आवश्यकता असते म्हणून येणाऱ्या- जाणाऱ्या वाटसरूंना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध केली आहे, त्याच बरोबर पशूपक्ष्यांसाठी देखील पाण्याची सुविधा उपलब्ध केली आहे , त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा,असे सांगितले. तर सदर पानपोईच्या उद्घाटन प्रसंगी सामाजिक कार्यकर्त्या - प्रमिलाताई शेवाळे म्हणाल्या की , पाणी हे निसर्गाने दिलेली अनमोल देणगी असून पाणी म्हणजे जीवन आहे आणि त्यासाठी समाज सेवक भास्करराव प्रधान यांनी त्यांच्या वडिलांच्या नावाने आनंद जलधारा पाणपोई सुरू केली , त्याबद्दल त्यांचे कौतुक केले , या प्रसंगी प्रा. नंदकिशोर खैरे यांनी पाण्याचे महत्त्व प्रतिपादन केले. सदर पाणपोईच्या उद्घाटन कार्यक्रमाला- गुंफाबाई इंगोले , सुजाताताई खरात , रंजनाताई देशमुख, मंदाताई धांडे, अश्विनीताई प्रधान, यमुनाताई देशमाने, सुवर्णाताई कांबळे, आनंदीताई पंडित, यशोदाबाई वाकोडे, वंदनाताई मोरे, वैशालीताई धांडे, सुनिताताई अंभोरे, अंतकलाताई जाधव, मिनाक्षीताई पोघे, सिमाताई गिरी, आशाताई खैरे, राधाताई गवई आदी महिला उपस्थिती होत्या .

# जलतारा योजनेच्या कामाचा शुभारंभ



**रिसोड** : रिठद येथे जिल्हाधिकारी भुवनेश्वरी एस यांच्या हस्ते नरेगा योजनेअंतर्गत जिल्हाधिकारी भुवनेश्वरी एस यांच्या हस्ते जलतारा योजनेचा शुभारंभ होत आहे. यावेळी रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा ते जंतर या सुद्धा उपस्थित असणार आहेत.

ही योजना रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या मार्गदर्शनाखाली व रिठदचे मंडळ अधिकारी पडवे यांच्या मार्गदर्शनाखाली तलाठी रूपाली संत्रे व कृषी सहाय्यक अनिल इंगोले आणि ग्रामविकास अधिकारी मोहन भुसारी यांचे देखरेखीखाली जलतारा योजने संदर्भात सर्व अल्पभूधारक शेतकऱ्यांना लाभ देण्याचा प्रयत्न व निसर्गाचा समतोल राखण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी पुढाकार घेऊन जलतारा योजना राबविण्यात येत आहे. त्याबाबत निसर्गाचे निसर्गपण जोपासण्यासाठी व उष्णतेचा पारा दरवर्षी वाढत चालला ती उष्णता थांबवण्यासाठी जलतारा योजना राबवणे गरजेचे आहे.

सर्व शेतकऱ्यांनी जलतारा योजना राबवावी. सर्व अल्पभूधारक शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा व जास्त जमीन असलेल्या शेतकऱ्यांनी सुद्धा स्वतःहून जलतरासारख्या योजना शेतामध्ये राबवल्या तर जगात उष्णतामान वाढणार नाही. याबाबतची प्रत्येक शेतकऱ्याने काळजी घेणे गरजेचे आहे. यासाठी सर्व शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी यांच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन रिठदचे ग्रामविकास अधिकारी मोहन भुसारी यांनी सर्व शेतकऱ्यांना केले आहे. (श.प्र.)

# जेष्ठ नागरिक व दिव्यांगांना मोफत साहित्य वाटप व तपासणी शिबीर

रिसोड : मालेगाव विधानसभा मतदारसंघातील साठ वर्ष व साठ वर्षा वरील ज्येष्ठ नागरिकांना व दिव्यांगांना मोफत अत्याधुनिक सहाय्यक साधनांचे वाटप करण्यासाठी पूर्व नोंदणी व तपासणी शिबिराचे आयोजन प्राथमिक आरोग्य केंद्र मंगरूळ झनक तालुका रिसोड जिल्हा वाशिम येथे १७ व १८ मार्च २०२५ रोजी वेळ सकाळी दहा ते सायंकाळी चार पर्यंत करण्यात आल्याचे रिसोड मालेगाव विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार अमित भाऊ झनक यांनी कळविले आहे.

भारत सरकार यांचा उपक्रम असलेल्या इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड, भारतीय कृत्रिम अंग निर्माण (अल्मिको) मुंबई जिल्हा प्रशासन वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने मा. आमदार अमित यांच्या विशेष सहकार्याने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

रिसोड मालेगाव विधानसभा मतदारसंघातील साठ वर्षे पुर्ण झालेल्या ज्येष्ठ नागरिकांना व दिव्यांगांना त्या आधुनिक सहाय्यक साधनांचे मोफत वाटप करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र मंगरूळ झनक तालुका



रिसोड जिल्हा वाशिम येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे या शिबिरात लाभ घेण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांनी सोबत साठ वर्षे पूर्ण झालेल्या आधार कार्डची झेरॉक्स राशन कार्ड ची झेरॉक्स व एक पाच फोटो तर दिव्यांगानी दिव्यांग प्रमाणपत्राची झेरॉक्स आधार कार्डची झेरॉक्स व रेशन कार्ड ची झेरॉक्स सोबत आणि अनिवार्य आहे. असे सदरील शिबिराचे आयोजन आमदार अमितभाऊ झनक यांनी कळवले आहे.

या शिबिरात जेष्ठ नागरिकां करिता विविध प्रकारच्या काठ्या विविध प्रकारचे बेल्ट व्हीलचेअर, कमोड चेअर, वॉकर, श्रवण यंत्र, तर दिव्यांगांसाठी विविध प्रकारच्या कुबडी जोडी, तीन चाकी सायकल व्हील चेअर, श्रवणयंत्र, एल्बोकेरेचर्स, बॅटरीवर चालणारी मोटर राईस ट्राय सायकल, तर अंध महाविद्यालयीन युवकांसाठी स्मार्टफोन व स्मार्ट केन इत्यादी साहित्यांचे वाटपासाठी पुर्व तपासणी व नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे असे आयोजन तर्फे कळविण्यात आले आहे तरी दुसऱ्या मालेगाव विधानसभा मतदारसंघातील ज्येष्ठ नागरिकांनी व दिव्यांगाने या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा आशा प्रकारचे आवाहन करण्यात आले आहे. (ता.प्र)

# कोयाळी भिसडे गावाचा प्रश्न थेट विधानसभेत गाजला

## आमदार अमित झनक यांनी उपस्थित केला प्रश्न



> नोंदच न झाल्यामुळे शेतकऱ्यांना शासनाच्या योजनेपासून वंचित राहावे लागत असल्याचा प्रश्न आ. अमित झनक यांनी विधानसभेत प्रखरपणे मांडून शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडली आहे. परिणामी या गंभीर बाबीची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तेव्हढ्याच गांभीर्याने दखल घेत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. आ. अमित झनक यांचा विधानसभेतील हा बुलंद आवाज मांडला आहे.

**रिसोड-** विधानसभा मतदार संघातील कोयाळी भिसडे या संपूर्ण गावाची ई - पीक पाहणीत नोंद झालीच नाही. परिणामी या गावातील सर्व शेतकऱ्यांना शासनाच्या विविध सुविधा व योजनांपासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे कोयाळी येथील शेतकऱ्यांना शासनाच्या हमी भाव योजनेचा लाभ घेता आला नाही. असा गंभीर प्रश्न रिसोड मालेगावचे आ. अमित झनक यांनी थेट विधानसभेत उपस्थित करून सबंधित शेतकऱ्यांवर झालेला अन्याय दूर करावा अशी मागणी केली आहे. आ. झनक यांच्या या प्रश्नाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद देत चूक कोणी केली याची शहानिशा करून सदर शेतकऱ्यांची ऑफलाईन नोंद घेतल्या जाईल असे स्पष्ट केले.

पेरणीची माहिती ऑनलाईन पद्धतीने नोंदवण्यासाठी सरकारने ई पीक पाहणी अॅप विकसित केले आहे. मात्र कधी सर्व्हर डाऊन, तर कधी नेटवर्कची अडचण आल्यास काही शेतकऱ्यांची नोंद न होणे साहजिक आहे. परंतु रिसोड तालुक्यातील कोयाळी भिसडे हे संपूर्ण गावच ई पीक पाहणीत बाद झाल्यामुळे येथील शेतकऱ्यांवर मोठा अन्याय झाला आहे. ई पीक पाहणीत नोंद नसल्यामुळे येथील शेतकऱ्यांना आपली सोयाबीन शासनाच्या हमी भाव योजनेत विकता आली नाही. तीच गत तूरीची आहे. कारण हमी भाव योजनेचा लाभघेण्यासाठी ई- पीक पाहणीची नोंद असणे बंधनकारक आहे. परंतु नोंदच न झाल्यामुळे शेतकऱ्यांना शासनाच्या योजनेपासून वंचित राहावे लागत असल्याचा प्रश्न आ. अमित झनक यांनी विधानसभेत प्रखरपणे मांडून शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडली आहे.

परिणामी या गंभीर बाबीची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तेव्हढ्याच गांभीर्याने दखल घेत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. आ. अमित झनक यांचा विधानसभेतील हा बुलंद आवाज त्यांच्या बळीराजा या उपाधीला साजेस असल्याची चर्चा रिसोड मालेगाव तालुक्यात होत आहे पिक पाहणी करण्याचे अंतिम जबाबदारी तलाठ्याचीच असते राज्याच्या अनेक भागात शेतकरी स्वतः ईपिक पाहणी करू शकत नाही त्यांच्या मागे अनेक कारणे आहेत. परंतु त्यांना शेतकऱ्याकडून काही चिरीमिरी मिळते का? याची वाट पाहत बसतात व ती मिळत नाही म्हणून हि कामेही करत नाहीत. शेतकरी मात्र सुलतानी व अस्मानी संकटामुळे बारा महिने ग्रासलेला असतो. असे प्रकार सतत चालू असतात.

त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आपल्या हत्यारितेच असलेल्या सर्व कार्याची दखल घेतली पाहिजे जर घेतली नाही तर समोरच्या कोणत्याही व्यक्तीचे नुकसान होते कोयाळी भिसडे या गावातील या प्रकारावरून लक्षात येते. अशी चर्चा मतदार संघातील जनतेमध्ये होत आहे. श.प्र.

## अंगणवाडी सेविका व पर्यवेक्षिकांना प्रोत्साहन भत्ता

मुंबई, दि. १२ : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरणाऱ्या अंगणवाडी सेविका व पर्यवेक्षिकांना प्रति अर्ज ५० रुपये प्रोत्साहन भत्ता देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता.

यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली असून निधी वितरणाची प्रक्रिया क्षेत्रीय स्तरावर सुरू असल्याची माहिती महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधानसभेत दिली. विधानसभा सदस्य रोहित पवार आणि वरूण देसाई यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी अंगणवाडी सेविकांना व पर्यवेक्षिका यांनी पात्र उमेदवारांचे अर्ज भरले होते. त्यांना प्रोत्साहन भत्ता देण्यासाठी ३१.३३ कोटी रुपये इतका निधी वितरित करण्यात आला आहे. या भत्त्याच्या वितरणाची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरू आहे आणि लवकरच अंगणवाडी सेविका आणि पर्यवेक्षिकांना लाभ मिळेल असे मंत्री आदिती तटकरे यांनी विधानसभेत सांगितले.

## प्रशासकीय कामकाजात ई-ऑफिस प्रणाली बंधनकारक

मुंबई, दि. १२ : राज्यातील शासकीय कामकाज अधिक लोकाभिमुख, गतिशील आणि पारदर्शक होण्यासाठी १ जानेवारी २०२५ पासून ई-ऑफिस प्रणालीद्वारे कामकाज करणे बंधनकारक करण्यात आले आहे. राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींमध्ये देखील ही प्रणाली लागू केली जाणार आहे.

# स्वामी विवेकानंद वाचनालयात महिला दिन



रिसोड : स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालय रिसोड रिसोड येथे जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षा सामाजिक कार्यकर्त्या सौ. माधुरीताई देशमुख तर प्रमुख अतिथी सौ. स्मितातांई सरनाईक होत्या.

प्रथम मॉ जिजाऊच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित महिलांचे स्वागत करण्यात आले. या प्रसंगी ग्रंथालय प्रदर्शनीचे फीत कापुन उद्घाटन केले. सर्व उपस्थित महिलांनी पुस्तकांची मनःपूर्वक पाहणी करून वाचण्यासाठी पुस्तके घेतली

प्रमुख अतिथी व अध्यक्षा यांनी महिलाच्या जीवना कडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन हा स्वच्छ भाव, गौरवपूर्ण व आदर युक्त असला पाहिजे असे आपल्या भाषणातून सांगितले. अध्यक्षीय भाषणातून देशमुख ताईंनी स्त्रिया बाबतीत अनुचित प्रकार घडत असल्याचे प्रकार वाढले ते आपण टी.व्ही. वर्तमान पत्रे, सोशल मिडियाच्या माध्यमातून बघतो. या बाबीचा तर खरोखर जेवढा निषेध, करावा तेवढा कमीच आहे या कार्यक्रमासाठी उपस्थित मनिषाताई इंगळे, ज्योतिताई पंचवटकर, स्वप्नालाई नागरे, जया रुहाटिया, मालुताई देशमुख, दर्शनालाई बुट्टे, अंजलीताई देशमुख, ऐश्वर्या देशमुख इत्यादी उपस्थित होते कार्यक्रमाचे आयोजन व संचालन, आभार प्रेरणा टेमधरे यांनी केले. श. प्र.

# विजेच्या धक्क्याने तरुण शेतकरी विष्णू खडसे यांचा दुर्देवी मृत्यु

# शेलु खडसे गावावर पसरली शोककळा



**वाशिम:** रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील होतकरू तरुण शेतकरी विष्णु शिवाजी खडसे यांचा विजेच्या धक्क्याने दुदैवी मृत्यू झाला. दि.15 मार्च रोजी विष्णु खडसे आपल्या शेतात काम करत असताना ही दुदैवी घटना घडली. एका होतकरू कष्टाळू आणि नेहमी हसतमुख असणाऱ्या तरुणावर अचानक काळाने घाला घातला आणि क्षणात होत्याचे नव्हते झाले. परिणामी शेलुखडसे गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत काबाडकष्ट करत तरुण शेतकरी विष्णु खडसे यांनी आपल्या शेतीचे नंदनवन केले होते. शेतीशी असलेली निष्ठा व सोबतच अल्पशा शेतीत भरपूर उत्पन्न घेण्याचा छंद या तरुण शेतकऱ्याला जडला होता. त्यामुळे पॉलीहाऊसच्या माध्यमातून विविध पिकांच्या बिजवाईचे उत्पन्न विष्णु व त्याचा परिवार घेत असतात. सदर पॉलीहाऊस मधील टमाट्याचे बी काढत असातांना मृतक विष्णु खडसे यांचा शेतातील विद्युत खांबाच्या तनाव्याला स्पर्ष झाला आणि ही दुर्दैवी घटना घडली असल्याची माहिती हाती आली आहे. याबाबत अधिक माहितीनुसार विष्णु खडसे व त्यांचा धाकटा भाऊ गणेश शिवाजी खडसे हे शेतात काम करत असताना गणेश हा शेतातीलच आपल्या घरात पाणी पिण्यासाठी गेला असता, आणि विष्णु खडसे हे आपल्या कामात व्यस्त होते. मात्र नजरचुकीने या तरुण शेतकऱ्याचा विद्युत प्रवाह असलेल्या तनव्याला स्पर्ष झाल्याने त्यांना विजेचा जबरदस्त धक्का बसून ते जाग्यावरच बेशुद्ध पडले. ही माहिती समोर येताच विष्णुचे नातेवाईक व गावकऱ्यांनी त्यास तातडीने एका खाजगी वाहनाने रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र तोपर्यंत वेळ निघून गेली होती. डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. सदर घटनेची माहिती रिसोड पोलिसांना मिळताच त्यांनी ग्रामीण रुग्णालयात धाव घेत घटनेची माहिती घेतली व घटना स्थळाचा पंचनामा केला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. मृतक विष्णु खडसे यांचे शवविच्छेदन करून पार्थिव नातेवाईकांच्या स्वाधीन केले. सायंकाळी सहा वाजता दरम्यान अत्यंत शोकाकुल वातावरणात या तरुण शेतकऱ्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रकरणी पुढील कारवाई पोलीस करत असल्याची माहिती नातेवाईकांकडून कळाली आहे.

### पत्नी, एक मुलगा व मुलगी क्षणात पोरके झाले.



तरुण शेतकरी विष्णु शिवाजी खडसे यांच्या अपघाती निधनाने त्यांची पत्नी, एक मुलगा व मुलगी क्षणात पोरके झाले. तर आई वडील आणि लहान भाऊ, भावजय यांचे छत्र हरपले आहे. विष्णु खडसे गेल्या अनेक वर्षांपासून आई, वडील, भाऊ अशा संपूर्ण परिवारासह आपल्या शेतातच घर बांधून रहात होते. काबाडकष्ट करून या परिवाराने शेतीचे नंदनवन केले आहे. विष्णु खडसे यांना प्रयोगशील शेती करण्याचा छंद असल्याने सदर तरुण तालुक्यातील, जिल्ह्यातील कृषी मेळाव्यात आवर्जून उपस्थित राहत होते. अशी माहिती त्यांच्या मित्रमंडळीकडून मिळाली आहे. त्यामुळे हा होतकरू शेतकरी आपल्या सुखी परिवारासोबत शेतीच्या कामात व्यस्त असायचा. मात्र 15 मार्च रोजी विजेच्या धक्क्याने या तरुणाचा मृत्यू झाला. आणि क्षणात होत्याचे नव्हते झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन चिमुकली मुलं, आई वडील, भाऊ, चुलते, काका या सर्वांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून या दुःखद घटनेने संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.